
# पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन,

## न्यू जर्सी, अमेरिका.

SCAN DONE



**अध्यक्षीय भाषण : श्री. रामदास कामत**

दिनांक : २८ ते ३१ मे २०१०

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

# न्यू जर्सी येथे भरलेल्या ९० व्या नाटयसंमेलनाचं
## अध्यक्षीय भाषण

रामदास कामत

रंगमंचावरील मान्यवर आणि उपस्थित नाटयरसिकहो,

अखिल भारतीय मराठी नाटयपरिषदेचं न्यू जर्सी येथे भरलेलं हे ९० वं संमेलन असलं तरी भारताबाहेर भरवलं जाणारं हे पहिलं अखिल भारतीय नाटयसंमेलन ! मात्र आजच्या या आनंदसोहळयाला एक दुःखाची किनार आहे. हे नाटयसंमेलन अमेरिकेत व्हावं अशी ज्यांची मनापासून इच्छा होती असे नाटयक्षेत्रातील एक कर्तबगार व्यक्तिमत्व श्री. मोहनराव वाघ आज आपल्यात नाहीत, याचं मला अतोनात दुःख होतं. मोहन वाघ म्हणजे नाटयक्षेत्रातील एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व ! ते स्वतः उत्तम छायाचित्रकार तसेच कुशल नेपथ्यकारही होते. नाटयप्रयोगाच्या प्रकाशयोजनेचीही त्यांना उत्तम जाण होती. नाटयसंपादमध्ये त्यांनी आपल्या नाटयजीवनाला प्रारंभ केला. कालांतराने त्यांनी चंद्रलेखा या त्यांच्या नाटयसंस्थेची स्थापना केली, आणि विविध प्रकारचे नाटयप्रयोग करायला सुरुवात केली. नाटयप्रयोगाची जाहिरात वैविध्यपूर्ण करण्यात त्यांची ख्याती होती. मोहन वाघ यांनी चंद्रलेखाद्वारे अडीच तपाच्या कारकिर्दीत हजारो नाटयप्रयोग नाटयरसिकांसमोर ठेवले. नाटयरसिकांनीही त्यांच्या सर्व कलाकृतींचे मनःपूर्वक स्वागत केले. मोहन वाघ यांची मराठी नाटयक्षेत्रात
नाटयक्षेत्रात
'विक्रमादित्य' म्हणूनच खास ओळख करुन दिली जात असे.

शेक्सपियरच्या जन्मगावी जाऊन आपल्या एका नाटयप्रयोगाचा मुहूर्त केला. 'विक्रान्त' या इंडियन नेव्हीच्या बोटीवर नाटयप्रयोग सादर केला. रात्री १२ वाजता प्रयोग करण्याची प्रथम कल्पना त्यांचीच ! माझी आठवण दगा देत नसेल तर शनिवार वाडयासमोर त्यांनीच प्रयोग सादर केला. असे आगळे - वेगळे प्रयोग करावेत असं नेहमी त्यांच्या मनात असायचं आणि त्याप्रमाणे त्यांनी अनेक प्रयोग करुन दाखवले. मोहन वाघ म्हणजे श्रध्दा, परिश्रम आणि यश यांचा त्रिवेणी संगम. प्रस्तुत नाटयसंमेलनाला अध्यक्ष म्हणून ते बिनविरोध निवडून आले होते. आज ते आपल्यात असते तर या नाटयसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे अधिकार सुपूर्द करायला मला मनस्वी आनंद झाला असता. पण कालचक्राला ते मान्य नव्हतं. विधीलिखित वेगळं होतं, आणि विधिलिखीतापुढे माणूस काही करु शकत नाही. आजचं हे नाटयसंमेलन मोहन वाघ यांच्या स्मृतिस समर्पित केलं गेलं आहे. मी त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करतो.

मराठीतील बरेच नाटयप्रयोग परदेशात झाले आहेत. श्री गोवा हिंदू असोसिएशनचे 'लेकुरे उदंड झाली' आणि 'हयवदन', मुंबई मराठी साहित्य संघाचे 'अजब न्याय वर्तुळाचा'. मोहन वाघ आणि सुधीर भट यांनीही आपल्या संस्थेतर्फे आणि इतरांनीही आपले नाटयप्रयोग परदेशात केले. प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांचे 'व-हाड निघालंय लंडनला' व वस्त्रहरणाचे प्रयोग परदेशात झाले. अशा घटना घडल्या असल्या तरी अखिल भारतीय मराठी नाटयसंमेलन भारताबाहेर भरण्याचा हाच पहिला मंगल सोहळा आहे. हा नाटयसोहळा यशस्वी व्हावा असे मनापासून वाटते.

रसिकहो, या आधीचे नाटयसंमेलन बीड येथे सव्वा वर्षापूर्वी साजरे झाले. बीडच्या या नाटयसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान नाटयरसिकांनी मला दिला. मराठी नाटयसृष्टीमध्ये नाटककार, कलावंत, नाटयकर्मी, रंगकर्मी अशा अनेक कर्तबगार व्यक्ती आहेत. त्यांना हा

एकांकिका आणि इतर नाटयप्रयोग त्या अमेरिकेच्या रंगभूमीवर सातत्याने सादर करीत असतात. मी त्यांना शुभेच्छा देतो आणि त्यांच्याकडून मराठी रंगभूमीची सेवा अधिकाधिक व्हावी यासाठी माझ्या सदिच्छा व्यक्त करतो.

नाटयसंमेलनाचे अध्यक्षीय भाषण हे पुन्हा पुन्हा करायचं नसंत. गतवर्षी बीड येथे नाटयसंमेलनाध्यक्ष या नात्याने केलेल्या भाषणात माझे नाटयविषयक विचार विस्तृतपणे मांडले आहेत. ते भाषण नाटयरसिकांनी जरुर वाचावे. आज प्रदीर्घ भाषण करणे योग्य नव्हे. समारंभाला अनुसरुन मी माझं भाषण थोडक्यात केलं आहे. आज मराठी रंगभूमीच्या दरबारात व्यावसायिक, प्रायोगिक, हौशी, कामगार नाटकांनी गर्दी केली आहे. प्रायोगिक रंगभूमीसाठी पूर्वी बंगाली नाटक प्रथम क्रमांकावर होते. आता ती जागा मराठी रंगभूमीने घेतली आहे. फक्त मराठी संगीत रंगभूमीची स्थिती चिंताजनक आहे. वास्तविक मराठी संगीत नाटक हे जागतिक रंगभूमीचे वैशिष्ट्य आहे. एकेकाळी तर संगीत रंगभूमीचा प्रचंड दबदबा होता. असं जरी असलं तरी संगीत रंगभूमी दृष्टीआड होत आहे याची मनाला खंत आहे. व्यावसायिक रंगभूमीची स्थिती फारशी उत्साहजनक नाही. मराठी रंगभूमीची सद्यस्थिती पाहून महाराष्ट्र शासनाने मराठी रंगभूमीसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. असे असूनसुध्दा मराठी व्यावसायिक रंगभूमीची सध्याची परिस्थिती सुस्थिर पायावर उभी नाही, याचं प्रमुख कारण दूरदर्शनचं आगमन ! साधारणपणे ८० वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ चालू असताना चित्रपट हे साधन लोकांच्या समोर आलं आणि त्याचा जबरदस्त धक्का मराठी रंगभूमीला बसला. मराठी रंगभूमीवरील चित्रपटांचं आक्रमण थोपवणं अशक्य झालं. आज जवळजवळ अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतात दूरदर्शन हे साधन करमणूकीसाठी लोकांसमोर आलं. आज मराठी भाषेतील दूरदर्शनच्या अनेक वाहिन्या

नाटयसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळणे अत्यंत आवश्यक होते. अशा कर्तबगार व्यक्तीकडे अधिकारसूत्रे देण्याचा योग मला आनंददायी वाटला असता. पण त्यासाठी आता मला काही काळ थांबावे लागेल....

रसिकहो, मी नाटयसंमेलनाचा अध्यक्ष झाल्यानंतर गेल्या सव्वा वर्षात मला शेकडो नाटयरसिक भेटले. अनेक समारंभांचा अध्यक्ष म्हणून मला आमंत्रित केलं गेलं. अनेक गुणवंतांना पारितोषिक प्रदान करण्याचा आनंद मला मिळाला. गेल्या सव्वा वर्षाचा अवधी हा माझ्या जीवनातील एक महान आनंद ठेवा आहे. आता या नाटयसंमेलनाला नवीन अध्यक्ष नसल्यामुळे माझीच अध्यक्षपदाची मुदत सन्मानाने वाढवली गेली आहे. ती जबाबदारी मी समर्थपणे पार पाडीन याची ग्वाही देतो.

माझ्या नाटयजीवनातील अतिशय लक्षणीय असा आनंद म्हणजे मराठी माणसाचे नाटयप्रेम! मराठी माणूस पृथ्वीच्या पाठीवर कोठेही जावो, तो आपले नाटयप्रेम आपल्याबरोबर घेऊन जातो. अमेरिकेसारख्या धनसंपन्न देशात हजारो मराठी व्यक्ती उदरनिर्वाहासाठी आल्या आहेत. अमेरिकेत मराठी नाटयरसिकांची मांदियाळी उभी आहे, हे आपण पाहत आहोत. डॉ. मीनाताई नेरुरकर आणि त्यांच्या सहका-यांनी इथे मराठी रंगभूमी सतत प्रगल्भ अशी ठेवली आहे, मराठी रंगदेवतेपुढील ही नाटयज्योत सतत प्रज्वलित ठेवली गेली आहे. मीनाताई नेरुरकर यांनी इथे कलाकारांना एकत्र आणलं आहे. या कलाभूमीत गायक, वादक असे अनेक गुणी कलावंत आहेत. मीनाताई नेरुरकर यांनी काही वर्षापूर्वी 'सुंदरा मनामध्ये भरली' या नावाचा लोकनाटयाचा प्रयोग सादर केला होता. या लोकनाटयाचे अनेक प्रयोग मुंबई, पुणे येथे यशस्वीपणे सादर केले. त्यांनीच लिहिलेल्या आणि नाटयसंपदेने सादर केलेल्या 'अवघा रंग एकचि झाला' या नाटकाचे जवळजवळ २७५ प्रयोग झाले आहेत आणि आता ३००व्या प्रयोगाकडे दिमाखाने वाटचाल करीत आहे. त्याशिवाय

कार्यतत्पर झाल्या आहेत. घराघरात प्रेक्षागृह झालं आहे. त्याचा परिणाम मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाला मारक ठरला आहे. दूरदर्शनमुळे लाखो लोकांसमोर आपलं नाव राहतं, प्रसिध्दी आणि पैसा मिळवता येतो या भावनेनं मराठी कलावंत दूरदर्शनची वाटचाल करु लागले आहेत. नाटयप्रयोगांच्या तालमी करण्यासाठी किंवा प्रयोग करायला सुध्दा त्यांना वेळ मिळत नाही. असं जरी चित्र असलं तरी प्रेक्षकांना आकर्षित करणा-या नाटयसंहिता, गुणज्ञ अभिनेते आणि निष्ठावंत निर्माते एकत्र आले तर उत्कृष्ट नाटकांची निर्मिती होऊ शकेल. पण हे यश सध्यां तरी दृष्टीपथात नाही.

मराठी व्यावसायिक रंगभूमी पुन्हा नवतेजाने झळाळण्यासाठी जाणकार आणि तज्ज्ञ व्यक्तींनी एकत्र येऊन विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते. महाराष्ट्र शासनाचं सहकार्य आपल्या पाठीशी सदोदित उभं आहे. सर्वांच्या सहकार्याने यशस्वी नाटयप्रयोगांची निर्मिती झाली तर तो महान आनंदयोग म्हणावा लागेल. आणि असे सुदिन लवकरच येवोत अशी इश्वरापाशी प्रार्थना करतो. मराठी व्यावसायिक रंगभूमी पुन्हा नवतेजाने प्रफुल्लित होवो अशी मी नटराजाच्या चरणी विनम्र भावाने प्रार्थना करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

। ।शुभं भवतु । ।